महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ २१ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २०६ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### महापौरपदाचे आरक्षण निर्णायक ठरणार

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर महापौरपदासाठी उत्सुकता शिखरावर पोहोचली आहे. आता या उत्सुकतेला उत्तर देणारं महत्त्वाचं टप्पा म्हणजे येत्या २२ जानेवारीला होणारी महापौरपदाचे आरक्षण ठरवणारी उच्चस्तरीय बैठक. राज्याचे नगरविकास मंत्री या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत, तर संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती यामध्ये अपेक्षित आहे. महापौरपदाचे आरक्षण हे केवळ एक औपचारिक निर्णय नाही; ते स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्तास्थापनेसाठी निर्णायक ठरते. कोणत्या पक्षाला, कोणत्या शहरात महापौरपद मिळेल, हे आरक्षण ठरवल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे या बैठकीचा निकाल राजकीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचा आहे. आरक्षण ठरवताना राज्य सरकारकडून स्पष्ट संदेश मिळाला आहे की हा निर्णय धोरणात्मक आणि न्याय्य मार्गाने घेतला जाईल. नगरविकास विभागाचे पत्रक, तसेच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री कार्यालयासहित वरिष्ठ सचिवांकडे पाठवले गेलेले असल्यामुळे शासनाची गंभीर भूमिका दिसून येते. महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर अनेक शहरांमध्ये आरक्षणावरून राजकीय चर्चा आणि मतभेद वाढले आहेत.

अशा परिस्थितीत २२ जानेवारीची बैठक केवळ एक औपचारिकता न राहता, सत्तास्थापनेसाठी निर्णायक टप्पा ठरणार आहे. राज्यातील राजकीय वातावरण आणि महापालिकांमधील संतुलन यावर या निर्णयाचा थेट परिणाम होणार असल्याने, सर्वच पक्षांनी या प्रक्रियेकडे मोठ्या गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. महत्त्वाचे म्हणजे, हे निर्णय फक्त एक दिवसात घडणारे नाहीत; हे राज्यातील लोकशाही प्रक्रियेत पारदर्शकता, न्याय्य वितरण आणि राजकीय संतुलन सुनिश्चित करण्याचे प्रतिक आहेत. त्यामुळे २२ जानेवारीपासून महापौरपदाच्या आरक्षणाबाबत सुरू होणारी चर्चा हे महत्त्वाचे पाऊल मानले पाहिजे.

# दावोसमध्ये महाराष्ट्राचा डंका

## पहिल्याच दिवशी १४ लाख ५० हजार कोटी गुंतवणुकींचे १९ सामंजस्य करार



**ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २०**

स्वित्झर्लंडमध्ये दावोस इथं आयोजित जागतिक आर्थिक परिषदेत कालच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारनं विविध कंपन्याबरोबर विक्रमी साडेचौदा लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. याअंतर्गत स्वाक्षरी केलेल्या १९ सामंजस्य करारांमुळे विविध क्षेत्रांमध्ये

- **नवीकरणीय ऊर्जा क्षेत्र: योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि. सोबत ४ हजार कोटी रुपयांचा करार.**
- **रिअल इस्टेट: लोढा डेव्हलपर्स लिमिटेड सोबत १ लाख कोटी रुपयांचा करार.**
- **अन्न व कृषी क्षेत्र: कार्ल्सबर्गसोबत ५०० कोटी रुपयांचा करार.**
- **विदर्भ पोलाद क्षेत्र: सुरजागड इस्पात लिमिटेड सोबत २० हजार कोटी रुपयांचा करार.**
- **लॉजिस्टिक्स क्षेत्र: MMRDA आणि SBG ग्रुपसोबत २० अब्ज डॉलर्सचा करार.**

१५ लाखांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होण्याचा अंदाज आहे. करार राज्याच्या विकसित महाराष्ट्र २०४७: व्हिजन आणि पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या महत्त्वाकांक्षी ध्येयाशी सुसंगत आहेत, असं राज्य सरकारच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

यावेळी राज्य शासनाने नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि. यांच्याबरोबर चार हजार कोटी रुपयांचा करार, लोढा डेव्हलपर्स लिमिटेड बरोबर एक लाख कोटी रुपयांचा करार, अन्न आणि कृषी क्षेत्रात कार्ल्सबर्ग यांच्याबरोबर ५०० कोटी रुपयांचा करार, विदर्भात पोलाद क्षेत्रात सुरजागड इस्पात लिमिटेड बरोबर २० हजार कोटी रुपयांचा करार, तर लॉजिस्टिक्स क्षेत्रात एमएमआरडीए आणि एसबीजी ग्रुप यांच्यात २० अब्ज डॉलर्सचा करार करण्यात आला.



### कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या

## सहा समित्यांच्या सभापती पदांवर महायुतीची छाप

**ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २०**

कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या सहा विषय समित्यांच्या निवडणुकीत भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस युतीला संपूर्ण यश मिळाले आहे. सर्व सहा समित्यांच्या सभापती पदांवर युतीच्या उमेदवारांची निवड झाली असून, चार समित्यांच्या सभापतीपदी आमदार किसन कथोरे समर्थकांना संधी मिळाली आहे.

यामुळे नगराध्यक्ष पदासह पालिकेचा संपूर्ण कारभार कथोरे समर्थकांच्या नेतृत्वाखाली सुचारू आणि परिणामकारक रीतीने चालवला जाणार आहे. आमदार किसन कथोरे यांनी नगर परिषदेच्या विकासावर लक्ष ठेवण्याची निश्चयात्मक तयारी केली असून, निवडणुकीपूर्वी भ्रष्टाचार उधळलेल्या संदर्भांचा निष्पक्ष निकाल घडवून, नागरिकांच्या हितासाठी नगरपालिकेची कार्यपद्धती सुधारण्याचे आश्वासन दिले.

नव्या नेतृत्वाखाली शासनाची कार्यक्षमता वाढेल, पारदर्शकता आणि विकासाच्या कामाला गती मिळेल अशी अपेक्षा आहे.

## 12 जिल्हा परिषद व 125 पंचायत समिती निवडणुकीसाठी

# उमेदवारी अर्ज भरण्याचा आज अंतिम दिवस

**ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २०**

महाराष्ट्रातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत उद्या संपणार आहे. १६ जानेवारीपासून उमेदवार अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून, २२ जानेवारीला अर्जांची छाननी होईल. २७ जानेवारीपर्यंत उमेदवार अर्ज मागे घेऊ शकतात आणि त्याच दिवशी अंतिम उमेदवारांची यादी जाहीर होईल तसेच मतदान चिन्ह वाटप केले जाईल. मतदारांना प्रचारासाठी ३ फेब्रुवारी मध्यरात्रीपर्यंत मोकळा वेळ दिला आहे. मतदान ५ फेब्रुवारी रोजी सकाळी साडे सात ते सायंकाळी साडे पाच या वेळेत होईल. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषदेसाठी १ आणि पंचायत समितीसाठी १ असे दोन मत द्यावे लागणार आहेत.

या निवडणुकीत ईव्हीएमचा वापर केला जाणार असून, १ जुलै २०२५ रोजी विधानसभेच्या मतदार यादीत नाव असलेल्या मतदारांना मतदानाचा अधिकार असेल. 'मताधिकार' या मोबाइल ॲपवरून मतदार आपले नाव यादीत शोधू शकतील.

निवडणुकीत २ कोटी ९ लाख मतदार मतदानाचा अधिकार बजावतील. यासाठी २५,४८२ मतदान केंद्रे उभी करण्यात आली आहेत, तसेच १,२८,००० अधिकारी आणि कर्मचारी या प्रक्रियेत काम करतील, असे निवडणूक आयोगाने सांगितले.

निवडणूक आयोगाकडून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी उमेदवारांना खर्च मर्यादा देण्यात आली आहे. त्यानुसार, 71 ते 75 निवडणूक विभाग असलेल्या जिल्हा परिषदांसाठी 9 लाख आणि त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी 6 लाख रुपये खर्च मर्यादा असेल.

तर, 61 ते 70 निवडणूक विभाग असलेल्या जिल्हा परिषदांसाठी 7 लाख 50 हजार आणि त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी 5 लाख 25 हजार रुपये खर्च मर्यादा असेल. तसेच, 50 ते 60 निवडणूक विभाग असलेल्या जिल्हा परिषदांसाठी 6 लाख आणि त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी 4 लाख 50 हजार रुपये खर्च मर्यादा असणार आहे.

# महापौरपदासाठी राजकारण तापले

### चार नगरसेवक नॉट रिचेबल ■ फोडाफोडीला वेग



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २०**

**ठाणे** : कल्याण–डोंबिवली महापालिका निवडणुकीनंतरही शहरातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. निवडणुकीत भाजपला ५०, शिवसेनेला ५३, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला ११, तर मनसेला ५ जागांवर यश मिळाले आहे. मात्र, एकाही पक्षाला ६२ हा बहुमताचा आकडा गाठता आलेला नसल्याने सत्तास्थापनेसाठी जोरदार हालचाली सुरू आहेत.

महापौरपद आपल्या ताब्यात यावे, यासाठी भाजप आणि शिवसेना या दोन्ही पक्षांकडून प्रयत्न सुरू असून, त्याच पार्श्वभूमीवर कल्याण–डोंबिवलीत फोडाफोडीच्या राजकारणाला वेग आल्याचे चित्र दिसत आहे. ठाकरे गटाच्या मशाल चिन्हावर निवडून आलेले नगरसेवक मधुर म्हात्रे आणि कीर्ती ढोणे हे अद्याप संपर्कात नसल्याची माहिती आहे. याशिवाय आणखी दोन नगरसेवक गटनेता निवडीच्या बैठकीला गैरहजर राहिले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून गटनेता निवडीसाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी सर्व ११ नगरसेवकांना निमंत्रण देण्यात आले होते. त्यापैकी ९ नगरसेवकांशी थेट संपर्क साधून बैठकीची माहिती देण्यात आली, तर २ नगरसेवक संपर्कात नसल्याने त्यांच्या घरातील सदस्यांकडे नोटीस देण्यात आली होती. मात्र, तरीही हे दोन्ही नगरसेवक बैठकीला अनुपस्थित राहिले. सध्या हे नगरसेवक अद्यापही नॉट रिचेबल असल्याचे सांगितले जात आहे.

महापौरपदाच्या गणितांमुळे येत्या काळात कल्याण–डोंबिवलीतील राजकारण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




## महत्वाचे




### पालघर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २०**

धनगर आरक्षण प्रश्नी उद्या मुंबईत आझाद मैदानावर आंदोलन करण्याकरता परवानगी मागणाऱ्या याचिकेवर तातडीनं सुनावणी घ्यायला मुंबई उच्च न्यायालयानं आज नकार दिला. गेल्या वर्षी मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी आझाद मैदानावर केलेल्या आंदोलनात उपोषणादरम्यान मुंबईत निर्माण झालेल्या परिस्थितीचा उल्लेख करत न्यायालयानं सांगितलं की, त्यांनीही एका दिवसासाठी परवानगी मागितली होती, मात्र ते सहा दिवस थांबून राहिले. आंदोलकांनी व्यापलेला भाग त्यांनी जाण्यापूर्वी स्वच्छ करावा असं सांगितलेलं असतानाही तो स्वच्छ न करता ते निघून गेले आणि महानगरपालिकेला ते काम करावं लागलं. त्यामुळे या याचिकेवर तातडीनं सुनावणी होणार नाही, आंदोलन कधीही करता येईल, असं न्यायालयानं याचिकाकर्त्यांना सुनावलं. या याचिकेवर येत्या २८ तारखेला सुनावणी होईल.

### अंबरनाथ नगरपरिषद सत्तावादावर २१ दिवसांत निर्णय द्या - उच्च न्यायालय

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ** : अंबरनाथ नगरपरिषदेच्या निवडणुकीनंतर सत्तेसाठी परस्पर हातमिळवणी करून उदयास आलेल्या एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आघाडीने बनवलेल्या सर्व समित्यांना उच्च न्यायालयाने सोमवारी स्थगिती दिली. न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठाने या वादावर पडदा टाकण्यासाठी अंबरनाथमध्ये नव्यान उदयास आलेली शिवसेना-राष्ट्रवादी गटाची आघाडी वैध की भाजप नेत्यांनी काँग्रेसच्या नगरसेवकांना हाताशी घेऊन स्थापन केलेली नवी आघाडी वैध याचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी दोघांची बाजू ऐकून २१ दिवसांत घ्यावा, असे आदेश दिले.

# वंचितच्या पाठिंब्याने शिंदेसेनेला बळ

## विरोधी बाकांवर फुलणार भाजपचं 'कमळ'?

**ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २०**
**उल्हासनगर**

उल्हासनगर महापालिका निवडणुकीत शिवसेना आणि भाजप समान जागा मिळाल्यानंतर सत्तेची सूत्रे वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेसच्या हाती गेली होती. मात्र मागील दोन दिवस 'नॉट रिचेबल' असलेल्या वंचितच्या दोन नगरसेवकांनी शिवसेनेला अधिकृत पाठिंबा जाहीर केला आहे. यामुळे ४० नगरसेवकांचे बळ मिळाले असून शिवसेनेचा महापौरपदाचा मार्ग सुकर झाला आहे, तर ३७ नगरसेवक असलेली भाजप विरोधी बाकावर बसणार आहे.




**उल्हासनगर महापालिका निवडणुकीत शिवसेना आणि भाजपच्या संख्याबलात तडजोड झाली होती. मागील दोन दिवस वंचितच्या दोन नगरसेवकांनी शिवसेनेला अधिकृत पाठिंबा दिल्याने महापौरपदाचा मार्ग सुकर झाला आहे.**

७८ जागांच्या निकालात भाजप ३७ तर शिवसेनेने ३६ जागांवर विजय मिळवला होता. शिवसेना साई युतीच्या उमेदवारामुळे महायुतीचे संख्याबळ ३७ झाले, आणि एका अपक्ष नगरसेविकेच्या प्रवेशामुळे ते ३८ पर्यंत पोहोचले.

मागील दोन दिवस खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संपर्कात असलेल्या वंचितच्या नगरसेविका सुरेखा सोनावणे आणि विकास खरात यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन शिवसेनेला अधिकृत पाठिंब्याचे पत्र दिले आहे. वंचितच्या नगरसेवकांच्या मते, प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी, दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत रखडलेली कामे मार्गी लावण्यासाठी त्यांनी शिवसेनेला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे वंचितला उपमहापौरपदासह महत्त्वाची पदे मिळण्याची शक्यता आहे.

# धुळीने भिवंडीतील नागरिक हैराण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी (प्रतिनिधी) भिवंडी शहरातील विविध भागात रस्त्याची सिमेंट काँक्रीटीकरण काम सार्वत्रिक निवडणुकी मुळे प्रलंबित पडली आहेत.तर अनेक ठिकाणी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. खड्डेमय रस्त्यावरून भरधाव चालणाऱ्या वाहणामुळे उडणाऱ्या मातीच्या धुळीने पादचारी व प्रवास करणाऱ्या नागरिकांसह रस्त्याचे कडेला इमारत, घरात राहणारे रहिवासी व दुकानदार हैराण झाले आहेत.**

●●●●

रस्त्यावरील उडणाऱ्या धुळीने शहरात वायू प्रदूषणात प्रचंड वाढ झाली असल्याने महिला नागरिकांसह विद्यार्थ्यांना खोकल्याचा व श्र्वसन आजाराचाचा त्रास जाणवू लागला आहे. त्यामुळे आजारावर उपचार घेण्यासाठी आता नागरिकांना हॉस्पिटल व दवाखान्याची पायरी चढावी लागत आहे शासन प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे. भिवंडी महापालिकेच्यावतीने शहरात अंजुर फाटा ते कल्याण नाका दरम्यान गत महिन्यात रस्ता रुंदीकरणाचे काम झाले रस्त्यालगत असलेल्या दुकान, घर,इमारत बांधकामांवर हातोडा पडल्याने रस्त्यावर दगड,वीट,रेती,मातीचे ढीग पडले आहेत. बांधकाम पाड कामामुळे प्रचंड धूळ सर्वत्र उडत असून शहरात प्रदूषण निर्माण झाले आहे. तसेच शहरा लगतच्या भिवंडी वाडा रस्त्याबरोबरच भिवंडी अंजुर फाटा चिंचोटी महामार्ग,अंजुर फाटा ठाणे महामार्ग,भिवंडी पारोळ महामार्ग या रस्त्यांवर दुरुस्तीचे काम सुरू असल्याने रस्त्या वरून प्रचंड धूळ उडत आहे. या धुळीमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावर चालणाऱ्या भरधाव वाहनामुळे माती उडणाऱ्या धुळीमुळे अनेकांच्या घरात व दुकान मातीचे थर साचत आहेत. पादचारी व रहिवासी नागरिकांना या धुळ प्रदुषणामुळे खोकला,श्वसनाचे आजार जडत आहेत. त्यामुळे महापालिका प्रशासन व बांधकाम विभाग अधिकाऱ्यांनी याबाबत लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.



**रस्त्यावरून उडणाऱ्या माती धुळी पासून संरक्षण करण्यासाठी महिला नागरिक व शालेय विद्यार्थ्यांनी मास्कचा वापर करावा तसेच थकवा अथवा जास्त प्रमाणात खोकला येत असेल तर जवळच्या दवाखान्यात जावे आणि उपचार करून घ्यावीत असे आवाहन भिवंडीतील डॉ.प्रसन्न सोमन यांनी केले आहे.**





## वाचक मनोगत

# आता स्विकृत नगरसेवकांच्या नियमाबाबत आणि घोडेबाजाराबाबत

महापालिकेच्या निवडणुकीचे निकाल लागले.त्यात काही तरले तर काही बुडाले.निवडणूक म्हटली की,जय पराजय हा असतोच.विजयी उमेदवारास जनमताचा कौल मिळाला म्हणून तो वा ती विजयी होतो. मात्र ज्यांना मतदारांनी नाकारलेच नव्हे तर चारीमुंड्या चित्त केले त्यांना लोकप्रतिनिधी म्हणवून घेण्याचा नैतिक अधिकार नसतो.परंतूआत्ता पार उताणे पडलेले काही पडीक उमेदवार स्विकृत नगरसेवक पद मिळावे म्हणून भिकाऱ्यासारखे पक्षश्रेष्ठी कडे कटोरा घेऊन उभेअसतात.अश्या पडीक व जनता जनार्दनाने लाथाडलेल्या लोकांना कोणत्याही पक्षाने स्विकृत सदस्य करू नये.तो जनतेचा व संविधानाचा अपमान ठरेल.स्विकृत नगरसेवक पदासाठी महापालिका अधिनियमात स्पष्ट निर्देश आहेत. डॉ.,वकील,वास्तुविशारद,शैक्षणिक क्षेत्रातील अनुभवी,महापालिकेतील अधिकारी पदाचा पदाचा अनुभवआवश्यकअसतो. त्यामागचा उद्धेश असा कि महापालिका प्रशासनास त्यांच्या विशेष ज्ञान व अनुभवाचा लाभ व्हावा.परंतू राजकीय पक्ष आपल्या नाराज कार्यकर्त्यांची वर्णी लावतात किंवा गडगन्ज श्रीमंत व्यक्तीकडून पक्ष निधी घेऊन त्यांची स्विकृत नगरसेवक पदासाठी निवड करतात.या पूर्वी घोटाळेबाज, भुमाफिया व गुंड प्रवृतीचे लोक स्विकृत नगरसेवक झाले आहेत.

ज्या कार्यकर्त्यास त्याची योग्यता असूनही उमेदवारी देताआली नाही,जे पक्षाशी एकनिष्ठ आहेत,जे तज्ज्ञ आहेत परंतू निवडणूक लढवू शकत नाहीत वा लढवू इच्छित नाहीत,अश्या पात्र लोकांची स्विकृत नगरसेवक पदी वर्णी लावली पाहिजे.अतिशय प्रगल्भ बुद्धत्तेच्या,प्रभावी वक्ताअसलेल्या तसेच महापालिका कारभाराचा गाढ अनुभव असलेल्या नेत्याची स्विकृत नगरसेवक पदी निवड झाली पाहिजे.सेवानिवृत्त लीगल ऑफिसर,सेवानिवृत्त लेखा अधिकारी,कायदेतज्ञ् अशा सारख्यांना स्विकृत नगरसेवक केले तर महापालिकेस त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ होईल.याच न्यायाने जे पराभूत झाले त्यांना स्विकृत नगरसेवक पदाची उमेदवारी नाकारली पाहिजे. तसेच मागच्या काळात ज्यांना स्विकृत नगरसेवक पद दिले होते,त्यांनाही पुन्हा स्विकृत नगरसेवक पद देऊ नये. असे काही महाभाग गूढग्याला बासिंग बंधून तयार असतात.नव्या दमाच्या,तरुण,अनुभवी, तसेच विशेष तज्ज्ञ व्यक्तींची स्विकृत नगरसेवक पदी निवड झाली पाहिजे. परंतु असे होणार नाही याबाबत मोठा घोडेबाजार होणार हे तर आपणा सर्वांस माहीतच आहे.

**- सुनिल इंगळे,सामाजिक कार्यकर्ते,**
**खडकपाडा,कल्याण-प.**



# धर्मरक्षणासाठी घराघरांतून छत्रपती शिवाजी महाराज निर्माण होण्याची गरज ! - श्रीमंत मुधोजी राजे भोसले

**दुर्गमध्ये दुमदुमली 'शौर्या'ची ललकारी: १००० हून अधिक युवकांचा स्वसंरक्षणासह राष्ट्र-धर्म रक्षणाचा संकल्प**




दुर्ग (छत्तीसगड) – "जेव्हा जेव्हा आपल्या माता-भगिनींवर आणि धर्मावर संकटे आली, तेव्हा तेव्हा आपल्या महापुरुषांनी मोठ्या शूरतेने आणि वीरतेने त्याचा सामना केला. वर्तमान स्थिती देखील आव्हानात्मक आहे. आज धर्म आणि राष्ट्राच्या रक्षणासाठी घराघरांतून छत्रपती शिवाजी महाराज निर्माण होण्याची आवश्यकता आहे," असे प्रतिपादन छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज श्रीमंत मुधोजी राजे भोसले यांनी केले.

हिंदू जनजागृती समिती आणि वैदिक गुरुकुल वेलफेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दुर्ग येथील महेश कॉलनी (पुलगाव, छत्तीसगड) मध्ये आयोजित दोन दिवसीय अनिवासी 'शौर्य जागृती प्रशिक्षण शिबिरा'त ते मार्गदर्शन करत होते. या महाशिबिरात दुर्ग, राजनांदगाव, रायपूर, खैरागड यांसह अनेक जिल्ह्यांतील १००० हून अधिक युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आणि स्वसंरक्षणासह धर्मरक्षणाचा संकल्प केला.

करาटे, लाठी आणि नानचाकूचे प्रशिक्षण या शिबिरात युवकांना केवळ बौद्धिकच नव्हे, तर शारीरिकदृष्ट्याही सक्षम करण्यात आले. मुख्य प्रशिक्षक श्री. निरंजन चोडणकर आणि त्यांच्या सहकारी प्रशिक्षकांनी युवकांना कराटे, लाठी काठी आणि नानचाकू चालवण्याचे प्रशिक्षण दिले. कठीण प्रसंगात स्वसंरक्षण कसे करावे, याचे सोपे आणि प्रभावी उपाय प्रात्यक्षिकांद्वारे (Demo) दाखवण्यात आले.

**मान्यवरांचे प्रभावी मार्गदर्शन:**

छत्तीसगडचे शिक्षणमंत्री श्री. गजेंद्र यादव : "ज्याप्रमाणे राजमाता जिजाऊंनी बाल शिवरायांना शस्त्र आणि शास्त्राचे शिक्षण देऊन हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली, तीच धग आज प्रत्येक युवकामध्ये जागृत करण्याची गरज आहे. बलवान शरीर आणि प्रबळ मनोबलाच्या जोरावरच आपण आपले राष्ट्र आणि कुटुंब सुरक्षित ठेवू शकतो."

**भाजपचे जेष्ठ नेते श्री. प्रबल प्रताप जुदेव** : "सनातन धर्माच्या रक्षणासाठी आजच्या युवकांना 'शास्त्र आणि शस्त्र' या दोन्हीचे ज्ञान असणे अनिवार्य आहे. युवकांचा हा उत्साह पाहून सनातन धर्म सुरक्षित हातात असल्याचा विश्वास वाटतो."

**संत पू. अशोक पात्रीकर (सनातन संस्था):** "शारीरिक बळासोबतच आत्मबळही आवश्यक आहे. यासाठी प्रतिदिन 'श्रीराम जय राम जय जय राम' हा नामजप करा. आता अन्याय सहन करायचा नाही, तर त्याचा प्रतिकार करायचा आहे."

श्री. सुनील घनवट (राज्य संघटक, हिंदू जनजागृती समिती): "डाव्या विचारसरणीच्या आणि देशविरोधी शक्ती युवकांना शौर्यहीन बनवू पाहत आहेत. याविरोधात आपल्याला सजग राहावे लागेल. स्वसंरक्षण प्रशिक्षण ही राष्ट्ररक्षणाची पहिली पायरी आहे."

प्रशासनाचे सहकार्य: दुर्गचे पोलीस अधीक्षक (SP) श्री. विजय अग्रवाल आणि उपअधीक्षक (DSP) श्रीमती भारती मारकाम यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना स्वसंरक्षणासाठी असलेल्या कायद्याची माहिती दिली आणि आश्वस्त केले की, "जर तुम्ही स्वसंरक्षणासाठी पाऊल उचलले, तर कायदा पूर्णपणे तुमच्या पाठीशी आहे."

वैदिक गुरुकुल वेलफेअर फाउंडेशनचे संस्थापक अधिवक्ता आशिष शर्मा यांनी गुरुकुलच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अंजली कानस्कर आणि श्रीमती मेघा राठी यांनी केले, तर प्रस्तावना श्री. कमल बिस्वाल यांनी मांडली. यावेळी महापौर श्रीमती अलका बागमार, आय.जी. श्री. विनोद अग्रवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## ठाण्यात व्यापाऱ्याला मारहाण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे:** दुकानासमोर इमिटेशन दागिन्यांची विक्री करण्यास अटकाव केल्याच्या रागातून फेरीवाला व्यावसायिक सतपालसिंग राजपूत याने कपडे विक्रेता कांतीलाल सुराना (६२) यांच्यासह भावाला मारहाण केली. राजपूत याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# सुहित जीवन ट्रस्टच्या विद्यार्थ्यांचे ॲथलेटिक्स स्पर्धांमध्ये सुयश



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : स्पेशल ओलंपिक भारत महाराष्ट्र आयोजित नागपूर, रामटेक येथे राज्यस्तरीय ॲथलेटिक्स आंतरशालेय स्पर्धा अत्यंत उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत राज्यातील 36 जिल्ह्यातील विविध संस्थांमधून निरनिराळ्या वयोगटांतील एकूण 320 विशेष खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत सुहित जीवन ट्रस्ट, पेण, रायगड मधील कु. मनीष गणेश म्हात्रे याने या स्पर्धेतील 18 वर्षांवरील वयोगटात उल्लेखनीय कामगिरी करत 200 मीटर धावणे या स्पर्धेत

## रायगड जिल्ह्याचे नाव उंचावले

सुवर्ण पदक कु. अर्जुन पांडुरंग वारे याने 14 ते 18 वयोगटात 200 मीटर धावणे यामध्ये रौप्य पदक तसेच कु. सिद्धीका मंदार पाटील हिने 6 ते 12 वयोगटात 50 मीटर धावणे यामध्ये सुवर्ण पदक पटकाविले. त्यांच्या या घवघवीत यशामुळे त्यांची 30 जानेवारी, 2026 रोजी, महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक, हरियाणा येथे होणार असलेल्या राष्ट्रीय स्तरावरील ॲथलेटिक्स स्पर्धांसाठी निवड झालेली आहे.संस्थेतील या विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट यशाबद्दल तसेच त्यांनी केवळ संस्थेचेच नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्याचे नाव उंचावल्या मुळे समाजाच्या विविध स्तरांतून व समस्त महाराष्ट्रातून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्याच्या या दैदिप्यमान यशामागे त्यांचे पालक, संस्था, शिक्षक यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य आहे. तीनही विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

# ७ नगरसेवकांसह उद्धव गटाची गटनोंदणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली निवडणूक निकालानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ठोस पाठिंब्याशिवाय कल्याण मध्ये पक्षाचे 11 नगरसेवक विजयी झाले. आणि त्यानंतर राजकीय घोडामोडीचे वळण पाहता मंगळवारी कोकण विभागीय आयुक्त यांच्याकडे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या गटाच्या नोंदणी साठी ११ नगरसेवकांपैकी, सात नगरसेवक उपस्थितीत राहिले असल्याने फुटाफुटीचे ग्रहण लागले का? तर गैहजर चार जणावर उबाठा पक्ष काय कारवाई करणार असा सवाल उभे राहिले आहेत. तर यावेळी शिवसेना ठाकरे पक्षाच्या गटनेते पदी उमेश बोरगावकर आणि पक्ष प्रतोदपदी संकेश भोईर यांची निवड केली असल्याची माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख बाळा परब यांनी दिली.

शिवसेना पक्षाच्या पक्ष फुटी नंतर शिवसेना पक्षाचे दोन पक्ष झाले. मात्र या निवडणुकीत पक्ष विभागणी नंतर उद्धव ठाकरेंची शिवसेना व शिंदेंची शिवसेना दोन्ही पक्ष एकमेकां विरोधात दोन हाथ करून उभे ठाकले होते. या निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांने कल्याण डोंबिवली विभागातून नव्या चेहऱ्यांना संधी देत निवडणुकीला सामोरे गेले. शिवसेना उद्धव ठाकरे गटाने मनसेशी युती करून जागा वाटपाची बोलणी केली. उद्धवसेनेने ६५ जागा तर मनसेने ५४ जागा घेतल्या मात्र प्रत्यक्षात उद्धवसेनेला केवळ ५४ ठिकाणी उमेदवार देता



आले. या निवडणूक रणसंग्रामात उबाठाचे ११नगरसेवक निवडून आले तर मनसेचे ५ नगरसेवक निवडून आले.

निवडणूक निकालानंतर भाजपा शिवसेना युतीमध्ये असताना महापौर पदासाठी पक्षीय बलाबल वाढण्यासाठी स्पर्धा सुरू झाल्याचे समजते. यातूनच उबाठा गटाचे ११पैकी सात नगरसेवक गट नोदंणीसाठी उपस्थित होते. तर चार नगरसेवक गैहजर राहिल्याने उबाठाला मोठा फटका बसल्याचे दिसत आहे. यांच अनुषंगाने कल्याण शिवसेना शहरप्रमुख उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बाळा परब यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले की, मंगळवारी कोकण विभागीय आयुक्त कार्यालय येथे केडीएमसी मध्ये उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नवनर्वचित ११नगरसेवका पैकी ४नगरसेवक उपस्थित नव्हते. उपस्थित ७ जणां मधील उमेश बोरगावकर यांची गटनेता पदी नियुक्ती करण्यात आली असून पक्षाच्या प्रतोदपदी संकेश भोईर यांची निवड करण्यात आली आहे. गैहजर नगरसेवक मधुर म्हात्रे, किर्ती ढोणे, राहूल कोट, स्वप्नाली केणे यांच्यावर कारवाई करणार असल्याचे सांगत, परब राहत असलेल्या प्रभागातील ४ उमेदवार उबाठा शिवसेनेचे निवडून आले असून लगतच्या प्रभागातून उबाठाचा एक उमेदवार असे एकूण 5 नगरसेवक निवडून आणले असल्याचे परब यांनी सांगितले.

तर एकंदरीत आजच्या केडीएमसी मधील राजकीय घडामोडी पाहता २२तारखेला जाहीर होणाऱ्या महापौर आरक्षण सोडतीनंतर वेगवान घडामोडी होतील आणि कोणता पक्ष महापौर पदाचा दावेदार ठरेल हे चित्र स्पष्ट होईल.

# प्राथमिक विद्यामंदिरमध्ये अविष्कार कल्पकतेतून कृतीकडे उपक्रमाचे आयोजन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : प्राथमिक विद्यामंदिर कर्णिक रोड कल्याण या शाळेत विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक विचारांना चालना मिळणारे प्रयोग,प्रकल्प,कृती, नवी संकल्पना सादर करण्यासाठी कल्पकता हवी यासाठी अविष्कार कल्पकतेतून कृतीकडे या स्पर्धात्मक उपक्रमाचे आयोजन केले होते. या उपक्रमात इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी सांघिक रित्या प्रकल्पाची मांडणी केली. अन्न व आरोग्य,वायु प्रदूषण, वाहतूक व दळणवळण, मानवनिर्मित आपत्ती व्यवस्थापन,टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे या विषयावर प्रकल्प मांडणी मुलांनी केली. अविष्कार कल्पकतेतून कृतीकडे या उपक्रमाचे उद्घाटन व परीक्षण धाकटे शहाडचे केंद्रप्रमुख रतिलाल चव्हाण व शीतल कोळी यांनी केले. शाळास्तरावर एकूण 70 प्रकल्पाची मांडणी करण्यात आली.

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण आयोजित अविष्कार कल्पकतेतून कृतीकडे या उपक्रमाच्या अंतिम फेरीसाठी चार प्रकल्पाची निवड करण्यात आली. संस्थेचे सरचिटणीस डॉक्टर निलेश रेवगडे यांच्या कल्पक कल्पनेतून हा उपक्रम आयोजित केला जातो. यामुळे मुलांना प्रत्यक्ष कृती करून प्रकल्प तयार करण्याचा आनंद मिळतो व वैज्ञानिक दृष्टिकोन समृद्ध होण्यास मदत मिळते अशा उपक्रमामुळे बाल वैज्ञानिक शाळेमध्ये तयार होण्यास मदत होते.

# डोंबिवली : घरगुती गॅस स्फोटात पाच जण जखमी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : डोंबिवली पूर्वेतील नवनीत नगर संकुलात घरगुती गॅस सिलेंडरमधून झालेल्या गळतीमुळे मध्यरात्री बाराच्या सुमारास भीषण स्फोट झाल्याची धक्कादायक घटना घडली. ज्यामध्ये 1 व्यक्ती गंभीर जखमी असून 4 जणांना किरकोळ दुखापत झाली आहे.

डोंबिवली पूर्वेतील देसलेपाडा परिसरातील नवनीत नगर संकुलातील एका इमारतीच्या 510 क्रमांकाच्या फ्लॅटमध्ये केतन देढिया हे वास्तव्यास आहेत. त्यांच्या घरातील गॅस सिलेंडरमधून गॅसची गळती सुरू होती. मध्यरात्री केतन देढिया घरी परतल्यानंतर लाईट चालू करताच अचानक मोठा स्फोट झाला. ज्यामध्ये केतन देढिया गंभीर जखमी झाले असून त्यांच्या घराचेही



मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

स्फोटाचा जोर इतका प्रचंड होता की शेजारील फ्लॅटमध्ये राहणारे मेहुल वासाड आणि विजय घोर हेदेखील किरकोळ जखमी झाले असून त्यांच्या घरांचेही नुकसान झाले आहे. तसेच केतन देढिया यांच्या घरातील खिडकी आणि लोखंडी ग्रील तुटून खाली कोसळले.

याच वेळी इमारतीच्या परिसरात खाली फिरत असलेले हरीश लोढाया आणि त्यांचा सात वर्षांचा मुलगा पार्श्व लढाया यांच्या अंगावर काचांचे तुकडे पडल्याने ते किरकोळ जखमी झाले. या जखमींना सोसायटीतील रहिवाशांनी तत्काळ जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले.

घटनेची माहिती मिळताच डोंबिवली अग्निशामक दल आणि मानपाडा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून घटनेचा पुढील तपास सुरू केला आहे.

# आमदार राजेश मोरे यांच्या हस्ते ॲड. रेश्मा भोपींच्या कार्यालयाचे उद्घाटन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : ऍड. रेश्मा गुरुनाथ भोपी यांच्या कार्यालयाचा उदघाटन सोहळा नुकताच संपन्न झाला. कल्याण कोर्टा शेजारील कमर्शिअल सेंटरमध्ये दुसऱ्या मजल्यावर त्यांचे कार्यालय सुरू करण्यात आले आहे. कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्याहस्ते फित कापून या नव्या कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले. या दरम्यान आमदार राजेश मोरे यांचं भोपी दांपत्या कडून स्वागत करण्यात आले. तर आमदार मोरे यांनीही ऍड. रेश्मा भोपी यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ऍड. रेश्मा भोपी या कल्याण जिल्हा फौजदारी न्यायालय वकील संस्थेच्या निवडणुकीत अध्यक्ष पदाच्या उमेदवार असून त्यांना जास्तीत जास्त मतांनी निवडून देण्याचे आवाहनही आमदार राजेश मोरे यांनी केले आहे. याबाबत ऍड. रेश्मा भोपी यांनी आमदार राजेश



मोरेंचे आभार व्यक्त केले. त्याचप्रमाणे वकील संस्थेच्या निवडणुकीत अध्यक्ष पदावर निवडून देण्यासाठीही त्यांनी आवाहन केले आहे. अध्यक्ष पदावर निवडून दिल्यास वकिलांच्या न्याय हक्कासाठी लढणार व आवाज उठवणार असे यावेळी ऍड.रेश्मा भोपी म्हणाल्या.ऍड.रेश्मा भोपी यांच्या नव्या कार्यालयाच्या उदघाटनास त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने वकील सहकाऱ्यांनी उपस्थित राहून भोपी यांना शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे उपस्थित महिलांसाठी हळदी कुंकू समारंभाचेही आयोजन ऍड.रेश्मा भोपी यांनी केले होते.

# भविष्यवेध



**बुधवार**
**२१ जानेवारी २०२६**

**मेष**
दीर्घकाळापासून असलेल्या समस्येतून आराम मिळेल आणि तुमच्या चातुर्याचे आणि क्षमतांचे कौतुक केले जाईल. चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे.

**वृषभ**
कामं विवेकाने आणि कुशलतेने करा. सध्याच्या वातावरणात तयार केलेल्या नवीन पॉलिसी अनेक समस्या सोडवतील. कामं सुरळीतपणे पार पडतील.

**मिथुन**
विमा किंवा गुंतवणूक योजना आखत असाल तर ते शुभ आणि फलदायी ठरेल. फक्त वरिष्ठांशी सल्ला मसलत करून निर्णय घ्या. मानसिक शांती मिळेल.

**कर्क**
एखाद्या कार्यक्रमाला उपस्थित राहाल आणि तुमच्या उपस्थितीचे कौतुक केले जाईल. तुम्हाला जुन्या समस्यांपासून मुक्तता मिळू शकेल.

**सिंह**
आत्मविश्वास आणि उर्जेने कामावर परताल. खूप जबाबदाऱ्या आणि कामाचा ताण असेल. कामाच्या ठिकाणी, प्रकल्प गांभीर्याने आणि प्रामाणिकपणे पूर्ण करा.

**कन्या**
प्रगती होण्याची शक्यता आहे. घरात शांत आणि आनंदी वातावरण असेल. मोठ्या भावासोबत मालमत्तेच्या बाबींवर चर्चा कराल ,आर्थिक योजना आखाल.

**तुळ**
तुम्हाला काही कायदेशीर अडचणी येत असतील तर त्या आज सोडवल्या जातील. महत्वाच्या व्यक्तीशी भेट होईल. तुम्हाला लक्षणीय यश मिळेल.

**वृश्चिक**
व्यावसायिक दृष्टिकोन तुम्हाला प्रत्येक परिस्थितीत संतुलन राखण्यास मदत करेल. वाहन किंवा महागड्या उपकरणात बिघाड होऊन मोठा खर्च येईल.

**धनु**
विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारसरणीत अधिक सकारात्मकता आणण्याची आवश्यकता आहे. आर्थिक परिस्थिती मजबूत राहील आणि आवश्यक वस्तू खरेदी कराल.

**मकर**
दिवस कौटुंबिक आनंद आणि शांती वाढवेल. कोणत्याही समस्या तुमच्या समजुतीने सोडवल्या जातील. तुमचे कुटुंब ढाल म्हणून काम करेल.

**कुंभ**
तुम्हाला धीर देईल. आजचा दिवस कौटुंबिक आनंद वाढवेल. काही कारणास्तव संघर्ष करत असाल तर आज तुम्हाला आराम मिळेल.

**मीन**
जोडीदाराकडून प्रकल्पाच्या कामात सहकार्य मिळेल. कामाबद्दलची तुमची आवड आणि यश तुम्हाला यश देईल. व्यवसायातील अडथळे दूर होतील.


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/






# .....तर भाजपला घ्यावा लागेल शिंदे गटाचा पाठिंबा !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**दि. 20 / मुंबई**

महापालिका निवडणुकीच्या निकालामध्ये भाजपनं राज्यात जोरदार मुसंडी मारली आहे, भाजप हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला. तर दुसऱ्या क्रमाकांवर शिवसेना शिंदे गट आहे, दरम्यान भाजप जरी राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरला असला तरी देखील अनेक महापालिकांमधील नगरसेवकांचं संख्याबळ असं आहे की तिथे जर भाजपला आपला महापौर बसवायचा असेल तर त्यांना तिथे मित्र पक्षाची गरज लागणार आहे. मित्र पक्षानं पाठिंबा दिला तरच त्या महापालिकांमध्ये भाजपचा महापौर होऊ शकतो. दरम्यान मुंबईमध्ये देखील हीच स्थिती आहे. मुंबई महापालिका निवडणुकीमध्ये देखील भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे, मुंबई महापालिकेत भाजपचे तब्बल 89 नगरसेवक निवडून आले. मात्र तरी देखील भाजप स्पष्ट बहुमतापासून दूर राहिला. मुंबई महापालिकेत शिवसेना शिंदे गटाला 29 जागा मिळाल्या आहेत, त्यामुळे आता मुंबईत जर सत्ता मिळवायची असेल तर भाजपला शिवसेना शिंदे गटाचा पाठिंबा घ्यावा लागणार आहे.

हीच स्थिती कमी अधिक फरकानं काही महापालिकांमध्ये आहे, कोल्हापूरमध्ये देखील अशिच स्थिती आहे. कोल्हापूरमध्ये 37 जागा जिंकत काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला, मात्र काँग्रेसला बहुमत मिळवता आलं नाही, तर दुसरीकडे भाजपचे या महापालिकेत 27 नगरसेवक निवडून आले आहेत, तर शिवसेना शिंदे गटाचे 15 त्यामुळे इथे देखील भाजपला पाठिंब्याची गरज लागणार आहे. दरम्यान हे सर्व सुरू असतानाच आता मोठी बातमी समोर येत आहे. ती म्हणजे कल्याणमध्ये ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष शरद पाटील यांनी शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख महेश गायकवाड यांची भेट घेतली आहे, दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली, दरम्यान ही भेट नेमकी कोणत्या कारणासाठी होती हे अद्याप समोर आलेलं नसलं तरी देखील या भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे. ही भेट शरद पटील यांच्या घरी झाली आहे. या भेटीमध्ये वैयक्तिक चर्चा झाल्याची माहिती शरद पाटील यांनी दिली आहे. मात्र ठाकरे गटाचे दोन नगरसेवक शिंदे गटाच्या संपर्कात असल्याने त्याविषयी देखील चर्चा झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.



# भिवंडी राडा प्रकरणी गुन्हे दाखल

## भाजपा-कोणार्क आघाडीच्या 44 जणांना अटक

**निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील वातावरण तणावपूर्ण झाले असून, त्याच पार्श्वभूमीवर माजी महापौर विलास पाटील यांच्या बंगल्यावर दगडफेकीची घटना घडली. या दगडफेकीमागे भाजप आमदार महेश चौघुले यांच्या समर्थकांचा हात असल्याचा आरोप विलास पाटील यांनी केला असून विलास पाटील आणि आमदार महेश चौघुले या दोघांचीही मुले एकमेकांविरोधात निवडणूक रिंगणात होती. निकालानंतर शहरात राजकीय तणाव वाढला होता. याच तणावातून माजी महापौर विलास पाटील यांच्या निवासस्थानावर दगडफेक झाल्याचा आरोप करण्यात आला.**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २० (भिवंडी) :**

भिवंडी महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर निर्माण झालेल्या तणावातून रविवारी रात्री शहरात मोठा राडा झाला. कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास पाटील यांच्या घरावर दगडफेक करून हल्ला करण्यात आला. या प्रकरणात पोलिसांनी भाजप व कोणार्क विकास आघाडीच्या एकूण ४४ जणांना अटक केली आहे. भाजप आमदार महेश चौघुले यांचे पुत्र मित चौघुले यांचा प्रभाग क्रमांक १ मध्ये माजी महापौर विलास पाटील यांचे पुत्र मयुरेश पाटील यांनी दणदणीत पराभव केल्यानंतर मागील काही दिवसांपासून परिसरात तणावाचे वातावरण होते. त्याच पार्श्वभूमीवर रविवारी रात्री विलास पाटील यांच्या निवासस्थानावर दगडफेक करण्यात आली. या घटनेनंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन्ही गट आमनेसामने आले, त्यामुळे परिस्थिती चिघळली. तणाव वाढताच पोलिसांनी घटनास्थळी लाठीमार करून जमाव पांगवला. रात्री उशिरापासून पहाटेपर्यंत सुरू असलेल्या कारवाईत विलास पाटील गटातील ३५, तर आमदार महेश चौघुले गटातील ८ जणांना अटक करण्यात आली. या घटनेमुळे भिवंडी शहरात तणावाचे वातावरण असून पोलिसांनी बंदोबस्त वाढवला आहे. परिस्थिती नियंत्रणात असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

**■ कार्यकर्त्यांना पोलीस कोठडी :**

"दोन्ही गटातील कार्यकर्त्यांवर पोलिसांनी विविध कलमांनुसार निजामपूर पोलीस ठाण्यात परस्पर गुन्हे दाखल केलेत. या प्रकरणी पोलिसांनी विलास पाटील यांच्या बंगल्यात बसलेल्या 35 जणांना ताब्यात घेतलंय. तर, भाजपा आमदार महेश चौघुले गटातील 8 जणांना असे एकूण 44 जणांना अटक केलीय. या सर्वांना भिवंडी न्यायालयात हजर केलंय. यावेळी न्यायालयानं या प्रकरणाच्या अधिक तपासासाठी सर्वांना पोलीस कोठडी सुनावली आहे," अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे यांनी दिली.

**■ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना निलंबित करण्याची मागणी :**

भिवंडी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. किरण चन्ने यांच्या नेतृत्वाखाली वकिलांनी सोमवारी दुपारी गोकुळ नगर येथील विलास पाटील यांच्या निवासस्थानी भेट देत हल्ला करणाऱ्या प्रवृत्तीचा निषेध केला. यावेळी त्यांनी निजामपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे यांना तत्काळ निलंबित करावे, अशी मागणी केली.

# टीईटीचा निकाल जाहीर !

## निकालाच्या टक्क्यात वाढ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २०**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार देशातील सर्व शाळांमधील शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आल्याने यंदा राज्यात परीक्षार्थींची विक्रमी नोंद झाली आहे. यावर्षी सुमारे पावणेपाच लाख उमेदवारांनी टीईटी परीक्षा दिली आहे.

राज्य परीक्षा परिषदेतर्फे दि. २३ नोव्हेंबर रोजी राज्यातील ३७ जिल्हा केंद्रांवर टीईटी परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर दि. १९ डिसेंबर रोजी अंतरिम उत्तरसूची जाहीर करण्यात आली असून, उत्तरसूचीवरील हरकती नोंदविण्यासाठी उमेदवारांना शेवटची संधी देण्यात आली आहे. या प्रक्रियेनंतर अंतिम निकाल जाहीर होणार असून सुमारे साडेतीन लाख उमेदवारांची प्रतीक्षा लवकरच संपणार आहे.

**■ निकालाचा टक्का वाढला**

यंदा डी.एड. आणि बी.एड. पदविकाधारक तसेच कार्यरत शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर सहभागामुळे निकालाचा टक्का ८.५३ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे चित्र आहे. दरम्यान, आगामी काळात कार्यरत शिक्षक व डी.एड. पदविकाधारकांसाठी स्वतंत्र परीक्षा घेण्यात यावी, अशी मागणी प्राथमिक शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे केली आहे.

# ७७ व्या प्रजासत्ताक दिनासाठी नवी दिल्ली सज्ज

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २०**

**नवी दिल्ली :** देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी राजधानी नवी दिल्ली पूर्णतः सज्ज झाली असून, कर्तव्यपथावर भारताच्या सामर्थ्याचे, सांस्कृतिक वैविध्याचे आणि आत्मनिर्भरतेच्या वाटचालीचे भव्य दर्शन घडणार आहे. यंदाच्या सोहळयाला युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे या प्रजासत्ताक दिन सोहळ्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे कर्तव्यपथावरील संचलनात भारताच्या लष्करी ताकदीसोबतच सांस्कृतिक समृद्धीचे प्रभावी सादरीकरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या वतीने 'गणेशोत्सव – आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित भव्य चित्ररथ सादर होणार असून, या चित्ररथातून राज्याची परंपरा, सांस्कृतिक वैभव आणि अर्थव्यवस्थेची ताकद अधोरेखित केली जाणार आहे. या संदर्भात माहिती देताना संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी सांगितले की, चित्ररथातून महाराष्ट्रातील उद्योग, कला, कृषी आणि लोकसंस्कृतीचे दर्शन घडवले जाईल. यंदा प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात प्रथमच 'बॅटल अॅरे' या आधुनिक युद्धरचनेचे प्रदर्शन होणार आहे. यामध्ये अर्जुन टँक, टी–९० भीष्म रणगाडे, राफेल लढाऊ विमाने तसेच स्वदेशी बनावटीची अत्याधुनिक शस्त्रास्त्रे सादर केली जाणार असून, भारताच्या संरक्षण क्षेत्रातील प्रगतीचे चित्तथरारक दर्शन घडेल. संचलनात लष्कराच्या १८ तुकड्या, १३ लष्करी बँड्स आणि एकूण ३० चित्ररथ सहभागी होणार आहेत.

विविध राज्यांचे लोकनृत्य, आणि सांस्कृतिक सादरीकरण करतील. ऑस्कर विजेते संगीतकार एम. एम. कीरवानी यांचे संगीत असून, निवेदनासाठी ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांचा भारदस्त आवाज लाभणार आहे. या सोहळयासाठी दहा हजार पाहुण्यांना आमंत्रित करण्यात आले असून, त्यामध्ये इस्रोचे शास्त्रज्ञ, 'लखपती दीदी' योजना लाभार्थी महिला, प्रगत शेतकरी यांचा समावेश आहे.

# बिहार भवनाविरोधात मनविसेचा निषेध

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

महाराष्ट्रात बिहार भवन उभारण्याच्या प्रस्तावाविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या (मनविसे) वतीने घाटकोपर परिसरात बॅनर झळकावत तीव्र निषेध नोंदविण्यात आला. 'बिहार भवन बांधल्यास त्याची अवस्था अशी करण्यात येईल,' असा आक्षेपार्ह मजकूर व चित्र असलेले बॅनर लावण्यात आले होते. ही बाब निदर्शनास येताच पहाटेच्या सुमारास घाटकोपर पोलिसांनी हे बॅनर काढून टाकले. बिहार भवनच्या प्रस्तावाला मनसेने कडाडून विरोध दर्शविला आहे. यासंदर्भात मनसेचे गटनेते यशवंत किल्लेदार यांनी प्रतिक्रिया देताना, 'जोपर्यंत मनसे अस्तित्वात आहे, तोपर्यंत महाराष्ट्रात बिहार भवन उभारू देणार नाही,' असे स्पष्ट मत व्यक्त केले होते. त्यानंतर मनविसेच्या वतीने बॅनरबाजी करण्यात आली. या बॅनरवरील मजकूर व चित्रांमधून बिहार भवन उभारल्यास त्याची तोडफोड करण्यात येईल, असा इशारा देण्यात आल्याचे मनविसेचे सचिव ॲड. अभिषेक सावंत यांनी सांगितले.

## अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

**कार्यालय : टिळकपथ, के. बी. रोड, अंबरनाथ (प.), ता. अंबरनाथ, जि. ठाणे. पिनकोड ४२१५०१**

मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, विद्युत विभागामार्फत खालील कामाकरिता कोटेशन मागवित आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | अंबरनाथ नगरपरिषद नवीन प्रशासकीय इमारतीमधील VRV & Split DX ए.सी. मशीनची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. |

सदरचे कोटेशन बंद पाकिटात दि. २९/०१/२०२६ रोजी सायं. ०३:०० वाजेपर्यंत अंबरनाथ नगरपरिषद कार्यालयात आणून द्यावेत. तसेच कोटेशन प्रशासनाच्या सोयीनुसार हजर कोटेशन धारकांसमक्ष उघडण्यात येतील. सदर कोटेशनचा तपशील विद्युत विभागात उपलब्ध आहे.

**जावक क्रमांक :**
**अंनप/विद्युत विभाग/२०२५-२०२६/३२४**
**दिनांक :- २०/०१/२०२६**

**Sd/-**
**मुख्याधिकारी,**
**अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ**

# ...तर 'शिंदेसेना' भाजपामध्ये विलीन होईल

## - ॲड.असीम सरोदे



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**उल्हासनगर, ता. २०**

**पुणे -** मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजपा शिवसेना महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर देखील मुंबईचा महापौर कोण याबाबत जोरदार चर्चा सुरू झाली असताना ॲड असीम सरोदे यांनी केलेल्या विधानाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे आणि उद्धव तसंच राज ठाकरे मिळून मुंबई महापालिकेतील राजकारण फिरवू शकतील, अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

एकीकडे मुंबईच्या महापौर पदाच्या बाबत जोरदार चर्चा सुरू झालेली असताना उद्या शिवसेना नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह याबाबत सुनावणीची तारीख सुप्रीम कोर्टात आहे.यावर ॲड असीम सरोदे म्हणाले की जर एकनाथ शिंदेंकडून पक्ष चिन्ह व शिवसेना नाव काढून घेतलं तर मुंबई महापालिकेत काय होईल? मला वाटतं 'शिंदेसेना' भाजपामध्ये विलीन होईल व एकनाथ शिंदे यांचं राजकीय महत्त्व एकदम कमी होईल. तसंच शिंदेंसोबतचे अनेकजण उद्धव ठाकरेंकडे स्वगृही परत जातील तसंच मूळ शिवसेना अधिक ताकदवान होईल. उद्धव आणि राज ठाकरे मिळून मुंबई महापालिकेतील राजकारण फिरवू शकतील. सर्वोच्च न्यायालयातील एका निर्णयामुळे सुरू झालेला खेळ सर्वोच्च न्यायालयात कधीतरी संपेल असं त्यांनी म्हटलं आहे.

यावेळी असीम सरोदे म्हणाले की, उद्या शिवसेना नाव, चिन्ह याबाबत सुप्रीम कोर्टात ३७ नंबरवर केस आहे. तिथपर्यंत कोर्ट जाण्याची शक्यता कमी आहे. तसंच जर कोर्टानं विनंतीला मान दिला तर लवकर सुनावणी होऊन उद्या निर्णय होऊ शकतो. तसंच संविधानिक दृष्टीनं निर्णय द्यायचं झाल तर हा निर्णय उद्धव ठाकरे यांच्या बाजूने लागेल आणि तसा निर्णय झाला तर याचा परिणाम नक्कीच होईल. तसंच उद्धव ठाकरे यांच्या बाजूने निर्णय झाला तर एकनाथ शिंदे यांना भाजपामध्ये विलीन व्हावं लागेल आणि असं झालं तर अनेकजण जे एकनाथ शिंदे यांच्यासोबत आहेत, ते मूळ शिवसेना पक्षाकडे परत जातील आणि मुंबई महापालिकेवर याचा परिणाम होईल. हे सर्व सर्वच्च न्यायालयाच्या निर्णयावर अवलंबून असणार असल्याचं यावेळी त्यांनी सांगितलं.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका

**-: जाहिर सुचना :-**

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण पूर्व व डोंबिवली विभागातील सेक्टर क्र. १, २ व ५ मधील खालील नमूद विद्यमान रस्ते/मंजुर विकास योजनेतील रस्ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० अन्वये विकसीत करण्याचा महापालिकेचा मानस आहे.

| अ.क्र. | सेक्टर | प्रस्तावीत रस्त्याचे नाव | विद्यमान/विकास योजनेतील रस्त्यांची | | प्रस्तावीत रत्यांची रुंदी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | लांबी | सरासरी रुंदी | | |
| १ | १ | कल्याण पूर्व वालधुनी आंबेडकर चौक ते हनुमान मंदिर पर्यंत विकास योजनेतील ९.०० मी. रुंद रस्ता १५.०० मी. करणे. | १२५.०० मी. | १२.०० मी. | १५.०० मी. | |
| २ | २ | डोंबिवली (प.) विभागातील दिनदयाळ रोड ते ओम शक्ती प्रसाद को.ऑ.हौ. सोसा. पर्यंत १२.०० मी. रुंद रस्ता करणे. | १३५.०० मी. | ५.५० मी. | १२.०० मी. | |
| ३ | ५ | डोंबिवली येथील गांधीनगर ले-आऊट मधील सुभाष डेअरी-पी.एन.टी. कॉलनी, सुभाष डेअरी-मानपाडा रस्ता १२.०० मी. करणे. | ६५०.०० मी. | ९.०० मी. | १२.०० मी. | |

ज्याअर्थी, भाग नकाशाच्या व प्रत्यक्ष जागेवरील सर्व्हेक्षण नकाशाच्या प्रतीवर वरील अनुक्रमांक १ ते ३ चे नकाशात दर्शविल्याप्रमाणे हे अस्तित्वातील रस्ते असून कल्याण डोंबिवली महानगरपालिका ही स्मार्ट सिटी अंतर्गत येत असल्याने उक्त रस्ते हे अरूंद आहेत. सदर परिसरातील दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या, त्याप्रमाणे वाढणारी वाहतूक व आरोग्य सेवा इत्यादी बाबींचा विचार करुन जनहिताच्या दृष्टीने उक्त सेक्टर क. १, २, ५ मधील विद्यमान रस्त्यास/मंजुर विकास योजनेतील रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या रेषा मा. आयुक्त महोदय यांच्या अनुक्रमे १) दि. ०४/१२/२०२५, २) दि. ०४/१२/२०२५, ३) दि. २४/११/२०२५ रोजीच्या मान्यतेनुसार विहीत करण्यात येत आहेत.

त्याअर्थी या जाहिर सुचनेव्दारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० मधील तरतुदीनुसार सदर परीसरातील तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व नागरीकांना या जाहिर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, उक्त प्रस्तावीत केलेले विद्यमान रस्ते/मंजुर विकास योजनेतील रस्ते महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील विकास योजनेतील भाग नकाशा व सर्व्हेक्षण नकाशावर विहीत करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० प्रमाणे कोणीही वरील प्रमाणे विहित केलेल्या सदर रस्त्यांच्या रेषेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू शकणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

१) नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांका पासुन एक महिन्याच्या मुदतीत आपल्या सुचना व हरकती असल्यास मा. प्रशासक तथा आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका द्वारा सचिव, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात.

२) सदर नोटीस व नकाशाची प्रत नागरिकांच्या माहितीसाठी नगररचना विभाग मुख्यालय नोटीस बोर्डवर व "४/जे, ७/ह, ८/ग प्रभाग क्षेत्र" कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे.

**जावक क्रमांक :**
**कडोंमपा/जसंवि/मुका/८४३**
**दिनांक :- २०/०१/२०२६**

**सही/-**
**(सं.ना. डोईफोडे )**
**सहाय्यक संचालक नगररचना**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

# उल्हासनगरमध्ये राजकारणाची नवी मांडणी दिग्गजांना धक्का, नव्यांना संधीचे संकेत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**उल्हासनगर,**
**ता. २० (वार्ताहर)**

लोकशाहीच्या रणांगणात यंदा उल्हासनगरने इतिहास रचला. उल्हासनगर महापालिका निवडणुकीत मतदारांनी जुने राजकीय गणिते उलथवून टाकत 'काम, जनसंपर्क आणि विश्वास' यांनाच कौल दिला. कुठे विक्रमी मताधिक्य, कुठे अवघ्या काही मतांनी विजय, तर अनेक दिग्गजांना धूळ चारत नव्या चेहऱ्यांनी सत्तासमीकरणच बदलून टाकले. या निकालांनी शहराच्या राजकारणाची 'दिशा आणि दशा' दोन्ही बदलल्याचे स्पष्ट झाले आहे.




उल्हासनगर महापालिका निवडणूक निकाल शहराच्या राजकारणात मोठा बदल घडवून आणणारे ठरले आहेत. अनेक प्रभागांमध्ये अटीतटींची लढत झाली, तर काही ठिकाणी मतदारांनी एकतर्फी कौल देत आपली भूमिका स्पष्ट केली. या निकालांनी हे अधोरेखित केले की, यंदा जात-पात किंवा पक्षनिष्ठेपेक्षा उमेदवारांचे काम, जनसंपर्क आणि विश्वासार्हता अधिक महत्त्वाची ठरली.

निवडणुकीतील सर्वांत मोठा विक्रम प्रेरणा माखीजानी यांनी प्रस्थापित केला. त्यांनी तब्बल ७,८४० मते मिळवत संपूर्ण पालिका निवडणुकीतील सर्वाधिक मते मिळविण्याचा मान पटकावला. त्यांच्या निकटवर्तीय प्रतिस्पर्धी आयशा वधरिया यांना ५,४८७ मते मिळाली, तर २,३५३ मतांच्या फरकाने प्रेरणा माखीजानी यांनी दणदणीत विजय मिळवून आपले वर्चस्व सिद्ध केले. दुसरीकडे, काही प्रभागांतील निकाल शेवटच्या क्षणापर्यंत श्वास रोखून ठेवणारे ठरले. पॅनल क्रमांक चारमध्ये भाजपच्या शोभा जाधव यांनी ३,११५ मते मिळवत शिंदे गटाच्या रूपाली म्हस्के यांचा अवघ्या १६ मतांच्या अत्यंत अल्प फरकाने पराभव केला. हा विजय जितका नाट्यमय, तितकाच तो संपूर्ण निवडणुकीतील सर्वात कमी मताधिक्याने मिळालेला विजय ठरला. याच्या अगदी उलट चित्र पॅनल क्रमांक १३ मध्ये पाहायला मिळाले. शिंदे गटाचे प्रदीप गोडसे यांनी ६,३५४ मते मिळवत आपली ताकद दाखवून दिली. त्यांच्या प्रतिस्पर्धी सुषमा घाग यांना केवळ १,६५३ मते मिळाल्याने ४,७०१ मतांच्या प्रचंड फरकाने प्रदीप गोडसे यांनी विजय मिळवला. हा विजय संपूर्ण निवडणुकीतील सर्वात मोठ्या मताधिक्याचा ठरला. एकूणच, उल्हासनगर महापालिका निवडणूक ही केवळ जागांची लढत न राहता, ती जनतेच्या बदलाच्या इच्छेची साक्ष ठरली आहे.



ठाणे ■ बुधवार
२१ जानेवारी २०२६
दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता



## ठाण्यात iPAS प्रणालीमुळे पारदर्शक प्रशासन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी / दि. २० (ठाणे) :** ठाणे जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणांसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत iPAS (इंटीग्रेटेड प्लॅनिंग ऑफिस ऑटोमेशन सिस्टिम) प्रणालीचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. जिल्हा नियोजन भवनातील समिती सभागृहात झालेल्या या प्रशिक्षणातून प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान व कार्यक्षम करण्यावर भर देण्यात आला. ज्य शासनाने जिल्हा नियोजन समित्यांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी iPAS प्रणालीचा १०० टक्के वापर अनिवार्य केला असून, 'कागदाचा कमीत कमी वापर' या धोरणानुसार राज्यातील सर्व ३६ जिल्हे कागदविरहित प्रक्रियेकडे वळले आहेत. या प्रणालीमुळे प्रशासकीय मंजुरी, निधी व्यवस्थापन व प्रकल्पांचे निरीक्षण सुलभ झाले असून, वित्त विभागाच्या BEAMS प्रणालीशी जोडणी केल्याने निधीवाटप प्रक्रियेत अधिक पारदर्शकता व वेग आला आहे. प्रशिक्षण ऑनलाइन पद्धतीने पार पडले असून जिल्ह्यातील विविध शासकीय यंत्रणांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



## मुंबई विद्यापीठाच्या क्रॉस कंट्री टूर्नामेंटच यशस्वी आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**गोवेली :** स्पर्धा या विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता आणि संघ भावनेला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित केल्या जातात आणि या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्यातलं कौशल्य आणि नेतृत्व सिद्ध करण्याची संधी यातून मिळत असते. आज दिनांक 19 जानेवारी 2026 रोजी जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे मुंबई विद्यापीठ आंतरविभागीय क्रॉस कंट्री टूर्नामेंट अंतर्गत डॉ.मनोज रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलं होतं. ही स्पर्धा केवळ धावण्यापूर्ती मर्यादित नसून संयम आत्मविश्वास आणि कठोर परिश्रमाची कसोटी होती. मुंबई विद्यापीठ क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रगती करत असून भविष्यातील राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडवण्याचा विद्यापीठाचा संकल्प आहे. मुंबई विद्यापीठाच्या या स्पर्धेमध्ये विविध झोन सहभागी झाले होते ज्यामध्ये जवळपास 50 विद्यार्थी ज्यापैकी 24 मुली आणि 26 मुले होती. यावेळेस प्रमुख



पाहुणे म्हणून निवड समितीचे डॉ. यज्ञेश्वर बागराव, शशांक उपाशेटे, रवींद्र कुमार सिंग, रामचंद्र कदम उपस्थित होते. यावेळेस डॉ. बागराव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करत विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या संपूर्ण आराखड्याबद्दल मार्गदर्शन केलं. या स्पर्धेमध्ये मुलांमध्ये प्रथम क्रमांक सुरज झोरे, द्वितीय क्रमांक स्वराज जोशी तृतीय क्रमांक संदीप जोशी तर मुलींमध्ये प्रथम क्रमांक आदिती पाटील द्वितीय क्रमांक खुशबू बघेल तृतीय क्रमांक काजल प्रजापती यांनी पटकावला. तर या स्पर्धेची मुलांमध्ये प्रथम चॅम्पियन टीम मुंबई शहर, द्वितीय कोकण झोन आणि तृतीय ठाणे झोन तर मुलींमध्ये प्रथम चॅम्पियनशिप मिळवणारी टीम ठाणे झोन द्वितीय मुंबई उपनगर तर तृतीय कोकण विभाग ठरली. या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचं पारितोषिक देऊन कौतुक करण्यात आलं. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा सतीश लकडे यांनी केले.यावेळेस जीवनदीप महाविद्यालयाचे संचालक प्रशांत घोडविंदे प्राचार्य अशोक वाघ , उप प्राचार्य हरेंद्र सोष्टे क्रीडा विभाग प्रमुख मोहनीश देशमुख यांचे सहकार्य लाभले. तसेच आंतरविभागीय समन्वयक संगीता गोरे हर्षद पाटील अक्षय टेंभे अक्षय वाडकर कल्पेश बोटके जीवनदीप महाविद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## खारेपाट विभागाला पाण्याचा हक्क हवा, भीक नको : सी. आर. म्हात्रे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण :** पेण तालुक्याशी वाशी शिर्की खारेपाट विभागात सात दिवसातून एकदा पाणी हे केवळ अजब नाही तर,जाणीवपूर्वक राबविला जाणारा खारेपाट विभागाला उध्वस्त करण्याचा नियोजित डाव आहे असा आरोप पेण खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी. आर.म्हात्रे यांनी केले आहे पाणी टंचाईचा प्रश्न हा नियोजित अन्याय आहे.हा विकास थांबविण्याचा कट आहे. हेटवणे आणि शहापाडा या दोन धरणांच्या कुशीत वसलेला हा विभाग,आज मात्र आपल्या हक्काचे पाणी न मिळाल्याने वणवण पाण्यासाठी भटकंती करत आहे.ही सत्तेची बेफिकिरी आहे. पाणी देण्याची क्षमता असूनसुद्धा सात दिवसातून एकदा पाणी देणे म्हणजे,जगा पण हळूहळू मरा असा आदेश देण्यासारखेच आहे.शेती कोलमडतेय जनावरे तडफडतायेत महिलांचे आयुष्य पाण्याच्या रांगेत झिजत आहे.प्रश्न हा पडतोय की ही रणनीती म्हणजे उध्वस्त करण्याचा नियोजित प्रयत्न आहे. अशी खंतह त्यांनी व्यक्त केली ज्या भागात पाणी पोहचायला पाहिजे तेथे मुद्दाम कुरघोडी करून पाणी अडविला जातोय,मुद्दाम फाईली अडकवल्या जातात,जिथे निधी खर्च व्हायला पाहिजे तेथे राजकीय उदासीनतेचे की कुलुप लावले जाते. सात दिवसातून एकदा पाणी देणे म्हणजे ,हा लोकांना संदेश देणे आहे, आत्ता तुमचा विभाग महत्वाचा नाही,की तुम्ही महत्वाचे नाहीत.मात्र सरकारचा हा संदेश आम्ही स्वीकारणार नाहीच खारेपाट विभागाला पाण्याची भीक नको तो हक्क आहे आणि हा हक्क मिळवल्या शिवाय राहणार नाहीआज तर कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करून , खारेपाट उध्वस्त करून त्यांचे अस्तित्व पुसून टाकले जाणार आहे.आत्ता एक चेतावणी आहे,निवडणुकीत याचे पडसाद उमटतील,जर येत्या काही दिवसात सुरळीत पाणी पुरवठा झाला नाहीतर संघर्ष अटळ आहे.निधी मंजूर आहे,काम सुरू आहे,मात्र पाईप लाइन दर्शन करण्यासाठी कोणताही लोकप्रतिनिधी भेट देऊ शकत नाही म्हणजे आश्चयम.खरे पाहता पाणी बाणी ही कृत्रिम आहे,ती नाहीशी झाली पाहिजे नाहीतर जनता रस्त्यावर उतरेल, ही सांगण्याची गरज नाही असा इशाराही सी आर म्हात्रे यांनी दिला.


महाराष्ट्र शासन
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड यांचे कार्यालय तालुका-मुरबाड जिल्हा - ठाणे**
कार्यालयाचा पत्ताः एम.आय.डी.सी. प्लॉट क्र.१४ ता. मुरबाड जि.ठाणे पिन कोडः ४२१४०१
दूरध्वनी क्र. ०२५२४-२२२१९९ ई-मेलः tahmurbad1@gmail.com

**जाहीर नोटीस**

प्रति,
१) **श्री. रामचंद्र जैतु चंदने,**
**रा. फणसोली ता. मुरबाड, जि. ठाणे**......................(अर्जदार)
विरुद्ध
२) **ग्रामपंचायत फणसोली**
**जन्म मृत्यु नोंदणी विभाग,**
**ता. मुरबाड, जि. ठाणे**.........................................(सामनेवाले)

तमाम जनतेस सदर नोटोसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे:

१. उपरोक्त अर्जदार यांचे वडील कै. जैतू सावळाराम चंदने, यांचा मृत्यु दिनांक ०७/०४/२००० रोजी राहत्या घरी मु. फणसोली ता. मुरबाड, जि. ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनावधानामुळे सदर जन्म/मृत्यूची नोंद निबंधक, जन्म, मृत्यु नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे दप्तरी करुन जन्म/ मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहिला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांसाठी मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे.
२. उशीरा मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज क्र. ११८९२ दाखल केला आहे.
३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणताही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे यांचे वडील यांचा मृत्युच्या नोंदणीचा दाखला मिळणे करीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे २०/०१/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

शिक्का

**हुकुमावरून**
**सही/-**
**श्री. महादेव देशमुख**
**सहाय्यक महसूल अधिकारी, मुरबाड**

**जा. क्र.फौजदारी/जन्म मृत्यू नोंद/कावि -११९६/२०२६**


## जेष्ठ नागरीक वर्धापन दिन संपन्न



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**वाशिंद :** जेष्ठ नागरीक संघ भिवंडीचा १७ वा जेष्ठ नागरीक वर्धापदिन संपन्न.
रविवार दि. १८ जानेवारी रोजी भिवंडी शहरातील पार्वती मंगल कार्यालयात मोठ्या दिमाखात हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. नगरसेवक महेंद्र देहेरकर उपस्थित होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून मान्यवर उपस्थित होते.जेष्ठ नागरीक संघ अनेक उपक्रम राबवीत असते. जेष्ठ नागरीकांच्या अडीअडचणींना धाऊन जाणारा संघ म्हणून हा संघ सुपरिचीत आहे. संघाच्या वर्धापन दिना निमित्य जेष्ठ नागरीक संघाचा सर्वोच्च जीवनगौरव पुरस्कार वैश्य समाजाचे बांधव नंदकुमार महादेव पुन्यार्थी यांना देऊन गौरवण्यात आले. या वेळी भिवंडी महानगर पालीकेतील नवनिर्वाचित नगरसेविका सौ.रोमा आळशी यांचाही सत्कार करण्यात आला. संघाचे माजी अध्यक्ष मधूकर तेलवणे, नंदकुमार मुंडे यांचाही संमान्न करण्यात आला. या वेळी संघाचे अध्यक्ष सदानंद पिंपळे, उपाध्यक्ष जयवंत सोनटक्के, श्रीमती सुरेखा मुंडे,पदाधिकारी, जेष्ठ नागरीक व जेष्ठ नागरीकांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे साहित्य चोरणारे जेरबंद

### एकूण १,३८,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण :** पेण नगरपरिषदेच्या इनडोअर गेम हॉलमधील गोदामातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयासाठी लागणारे मौल्यवान ब्रास (पंचधातू) साहित्य चोरणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना पेण पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक केली. त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे.
पेण नगरपरिषदेच्या बाजूच्या कारखान्याच्या गोदामात



ठेवलेले १,२१,९०० रुपयांचे साहित्य १४ ते १५ जानेवारी दरम्यान चोरीला गेले होते. याप्रकरणी शिल्पकार गणेश मयेकर यांनी तक्रार दाखल केली होती. सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसतानाही पोलिसांनी परिसरातील इतर कॅमेरे आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने तपास करत तरूण विलास चव्हाण (वय २१) आणि राम विजय गवळी उर्फ रामा रेड्डी (वय ३७), दोघेही आय.टी. आय कॉलेजजवळील झोपडपट्टीतील रहिवासी, यांना ताब्यात घेतले.
तपासादरम्यान आरोपींनी पेण पोलीस ठाण्यातील आणखी एका चोरीच्या (गुन्हा र.नं. ०३/२०२६) गुन्ह्याची कबुली दिली. दोन्ही गुन्ह्यांतील एकूण १,३८,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल आणि पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश राजपूत, सुनील चव्हाण, राजेश पाटील व त्यांच्या पथकाने केली. अवघ्या २४ तासांत गुन्ह्याची उकल केल्याबद्दल पेण पोलिसांचे कौतुक होत आहे.

## कबुतराची सुखरूप सुटका

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**ठाणे :** पालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या जवानांनी माणुसकीचे दर्शन घडवत कबुतराचे प्राण वाचवले. लुईसवाडीतील एका इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील खिडकीच्या ग्रीलमध्ये अडकलेल्या कबुतराची सोमवारी सकाळी ११:३० वाजता सुखरूप सुटका केली. लुईसवाडी, साईबाबा मंदिरसमोरील राजदर्शन सोसायटीत एका खिडकीच्या ग्रीलमध्ये कबूतर अडकल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या नियंत्रण कक्षाला मिळाली. घटनेचे गांभीर्य ओळखून आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

## आगामी जनगणना होणार डिजिटल स्वरुपात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**ठाणे:** जनगणना 2027 Houselisting Block Formation (घर यादी तयार करणे) बाबत महत्वाचे प्रशिक्षण आज दि.19 जानेवारी रोजी समिती सभागृह, पाचवा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित करण्यात आले होते.
यावेळी जनगणना संचालनालयाचे अधिकारी श्री. प्रवीण भगत, सहाय्यक निर्देशक व सांख्यिकी अन्वेशक श्री. अरुण साळगांवकर यांनी ठाणे जिल्ह्यातील सर्व चार्ज अधिकारी तसेच त्यांच्या अधिनस्त जनगणना विषयक कामकाज हाताळणारे संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांना Houselisting Block Formation (घर यादी तयार करणे) बाबत प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणासाठी स्वतः जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने, तहसिलदार (सर्वसाधारण) श्री. सचिन चौधर, भिवंडी तहसिलदार श्री.अभिजित खोले, मुरबाड तहसिलदार श्री.अभिजित देशमुख, शहापूर तहसिलदार श्री. परमेश्वर कासुळे, अंबरनाथ तहसिलदार श्री.अमित पुरी यांच्यासह इतर संबंधित अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

## भिवंडी घटनेचा गुन्हे शाखेकडून तपास सुरु

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी :** भिवंडी शहरात दोन गटांमध्ये झालेली हाणामारी व दगडफेक ही दुर्दैवी असून निवडणुकीतील जय-पराजय खेळाडू वृत्तीने स्वीकारला पाहिजे, असे प्रतिपादन ठाणे सहपोलीस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी केले. शांतता समितीच्या बैठकीत बोलताना कायदा सुव्यवस्था बिघडवणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशाराही त्यांनी दिला.
भिवंडी महापालिकेच्या निवडणुकीत भाजपच्या संपूर्ण पॅनलचा पराभव झाल्यानंतर




निर्माण झालेल्या नाराजीतून माजी महापौर विलास पाटील यांच्या बंगल्यावर दगडफेक व तोडफोड करण्यात आली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात मोठ्या प्रमाणात गोंधळ व दगडफेक झाली. या घटनांत माजी महापौर प्रतिभा पाटील यांच्यासह काही युवक जखमी झाले. तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाल्यानंतर पोलिसांनी लाठीचार्ज करून जमाव पांगवला.
या प्रकरणी पोलिसांनी पाच गुन्हे दाखल करून सुमारे दीडशे जणांना ताब्यात घेतले असून उर्वरित आरोपींचा सीसीटीव्हीच्या माध्यमातून शोध घेऊन कारवाई केली जाईल, असे डॉ. चव्हाण यांनी सांगितले. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, सोशल मीडियावर अफवा पसरवू नयेत आणि कोणतीही घटना तात्काळ पोलिसांना कळवावी, असे आवाहन त्यांनी केले.
गेल्या वर्षभरात ठाणे पोलीस आयुक्तालयात तीनशेहून अधिक गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले असून भिवंडीमध्ये सत्तर गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती देत, शहरात रूटमार्च व उशिरापर्यंत सुरू असलेल्या आस्थापनांवर कठोर कारवाईचे निर्देश देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## कल्याण-डोंबिवलीत सत्तासंघर्ष तीव्र

### शिंदे गटाच्या संपर्कातील दोन नगरसेवकांना नोटीस

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण :** शिवसेना ठाकरे गटाकडून निवडून आलेले दोन नगरसेवक शिंदे गटाच्या संपर्कात असल्याच्या चर्चांमुळे ठाकरे गट सतर्क झाला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाप्रमुख शरद पाटील यांनी संबंधित नगरसेवकांच्या घरी जाऊन नोटीस दिली. नगरसेवक मधूर म्हात्रे यांच्या वडिलांना व नगरसेविका कीर्ती ढोणे यांच्या बहिणीकडे नोटीस सुपूर्द करण्यात आली आहे. उद्या होणाऱ्या पक्षाच्या गट स्थापनेच्या बैठकीस उपस्थित राहावे, अन्यथा पक्षविरोधी कारवाई केली जाईल, असा इशारा या नोटीसीत देण्यात आला आहे.
कल्याण-डोंबिवली महापालिकेत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. शिवसेनेला ५३ तर भाजपला ५० जागा मिळाल्या असून बहुमतासाठी ६२ जागांची आवश्यकता आहे. त्यामुळे महापौर पदासाठी दोन्ही पक्षांकडून हालचाली सुरू असून ठाकरे गटाच्या १६ नगरसेवकांकडे विशेष लक्ष दिले जात आहे.
दरम्यान, नगरसेवक मधूर म्हात्रे यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेतल्याचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ठाकरे गट अधिक सतर्क झाला. संबंधित नगरसेवक संपर्कात नसल्याने त्यांच्या कुटुंबियांमार्फत सूचना देण्यात आल्याचे जिल्हाप्रमुख शरद पाटील यांनी स्पष्ट केले. बैठकीस गैरहजर राहिल्यास अपात्रतेसह शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

## कोहिनूर फिल्म फेस्टिवलमध्ये 'डब्बा'चा डबल धमाका

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**कल्याण :** मुंबई येथे आयोजित कोहिनूर फिल्म फेस्टिवल २०२५ मध्ये जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथील मुख्याध्यापक तथा दिग्दर्शक अजय पाटील दिग्दर्शित 'डब्बा' या लघुपटाने घवघवीत यश संपादन केले. या लघुपटासाठी अजय पाटील यांना बेस्ट डायरेक्टर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर 'डब्बा' लघुपटातील बालकलाकार नेहा झुंजारराव हिला चाइल्ड आर्टिस्ट म्हणून गौरविण्यात आले. त्यामुळे



'डब्बा' लघुपटासाठी हा क्षण खऱ्या अर्थाने डबल धमाका ठरला आहे.
या स्पर्धेत सुमारे २०० हून अधिक लघुपटांची नोंदणी झाली होती. महाराष्ट्रासह देश-विदेशातील नामवंत कलाकार, दिग्दर्शक आणि चित्रपटसृष्टीतील मान्यवर या सोहळ्याला उपस्थित होते. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर दिनकर जाधव, स्वप्निल वाकणकर, विनायक सपकाळे, सुहास पाध्ये आणि गणेश गुंजाळ हे मान्यवर उपस्थित होते. 'डब्बा' या लघुपटाने आतापर्यंत सहा वेगवेगळ्या ठिकाणी पारितोषिके मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. अजय पाटील यांनी आजपर्यंत १०० पेक्षा अधिक लघुपटांची निर्मिती केली असून हे सर्व लघुपट शैक्षणिक व सामाजिक विषयांवर आधारित आहेत. त्यांच्या लघुपटांना एनसीईआरटी दिल्ली, महाराष्ट्र तसेच परदेशातही विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. अजय पाटील सध्या जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असून शैक्षणिक विषयांवर आधारित लघुपटांच्या माध्यमातून समाजात मोठ्या प्रमाणावर जनजागृती करत आहेत. 'डब्बा' हा लघुपट शिक्षक पेशाला सकारात्मक ऊर्जा देणारा असून या लघुपटात राहनाळ शाळेतील अनेक विद्यार्थी व शिक्षकांनी अभिनय केला आहे. या यशामुळे शिक्षण आणि चित्रपट या दोन्ही क्षेत्रांत जिल्ह्याचा नावलौकिक वाढला असून अजय पाटील आणि 'डब्बा' टीमचे सर्वत्र कौतुक होत आहे.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024